| लातूर | वर्ष ३४ वे | अंक ३१२ वा | रविवार, दिनांक ०८ मार्च २०२६ | पृष्ठ ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# तीनशे कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य; विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घेत व्यापक कार्यक्रम राबविण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पर्यावरण आणि विकास यांचा समतोल साधण्यावर राज्य शासनाचा भर

**मुंबई/प्रतिनिधी :** पर्यावरणाचे संर्वधन आणि विकास यांचा समतोल साधण्यावर राज्य शासनाचा भर आहे. राज्यात वृक्ष व वनक्षेत्राचे प्रमाण वाढवण्यासाठी मिशन मोडमध्ये ३०० कोटी (३ अब्ज) वृक्षलागवडीचा संकल्प राज्य शासनाने केला असून यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घेत व्यापक कार्यक्रम राबविला जाणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबईतील हॉटेल सहारा येथे नानाजी देशमुख प्रतिष्ठान आणि अमेनिटी ट्री केअर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुस-या आंतरराष्ट्रीय आर्बोरीकल्चर परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी नानाजी देशमुख प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय पांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर्यन पांडे,अमेनिटी ट्री केअर फाऊंडेशनचे वैभव राजे यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील वन व वृक्षआच्छादनाचे प्रमाण वाढवण्यासाठी मिशन मोडमध्ये ३०० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येणार




असून पर्यावरणीय समतोल राखत शाश्वत विकास साधणे हे राज्य शासनाचे धोरण आहे. आजच्या युगात विकास आणि पर्यावरण संवर्धन यामध्ये संघर्ष नाही, तर दोन्ही गोष्टी एकत्रितपणे पुढे नेणे हीच काळाची गरज आहे. राज्याचा विकास आवश्यक असला तरी पर्यावरणाच्या संरक्षणाशी कोणताही तडजोड होऊ शकत नाही.

शाश्वत विकास आणि पर्यावरणीय संतुलन हेच आजचे धोरण असल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राच्या यावर्षीच्या अर्थसंकल्पात राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याची घोषणा करण्यात आली आहे. सध्या राज्यातील वृक्ष व वनक्षेत्राचे प्रमाण सुमारे २३ टक्के आहे. ते किमान ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी सुमारे २५० कोटी वृक्षांची आवश्यकता असून सुरक्षिततेच्या दृष्टीने ३०० कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ही वृक्षलागवड केवळ संख्येपुरती मर्यादित न राहता तिचा प्रत्यक्ष परिणाम दिसावा, यासाठी हवामान, माती, स्थानिक परिस्थिती आणि दीर्घकालीन टिकाऊपणा यांचा विचार करून संपूर्ण मोहिमेची वैज्ञानिक रचना केली जाणार आहे. पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारे तज्ज्ञ, संशोधक आणि स्टार्टअप्स यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाईल. लवकरच या क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी स्वतंत्र परिषदही आयोजित करण्यात येणार आहे.

मुंबईतील विकासकामांदरम्यान पर्यावरण संवर्धनाची काळजी घेतली जात असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, किनारी रस्ता प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांदरम्यान काही मॅन्ग्रोव्ह क्षेत्रावर परिणाम झाला असला तरी भरपाई स्वरूपात दोन मॅन्ग्रोव्ह उद्याने विकसित करण्यात आली आहेत. परिणामी, फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडीयाच्या अहवालानुसार मुंबईतील मॅन्ग्रोव्ह क्षेत्र वाढण्यात यश आले आहे.

आर्बोरिकल्चरच्या मदतीने वृक्षांचे आरोग्य तपासणे, त्यांचे संरक्षण करणे आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वृक्षांचे संपूर्ण जीवनचक्र नोंदवणे शक्य होत आहे. 'डिजिटल ट्विन' सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक वृक्षाची माहिती आणि देखभाल व्यवस्थापन करता येणार आहे. तसेच रस्ते प्रकल्पांमध्ये वृक्ष स्थलांतराची (ट्री ट्रान्सप्लांटेशन) यशस्वीता पूर्वी ३० ते ४० टक्के होती, ती आता सुमारे ८० टक्क्यांपर्यंत वाढली असून नवीन तंत्रज्ञानामुळे ती १०० टक्क्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न होणार असल्याचे श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

भारतीय संस्कृतीत निसर्ग आणि वृक्षांशी सुसंवाद ठेवण्याची परंपरा आहे. वेदकालीन विचारांपासून ते आयुर्वेदातील 'वृक्ष आयुर्वेद'पर्यंत अनेक ग्रंथांत वृक्षांचे महत्त्व सांगितले आहे. मात्र, काही काळ आपण शाश्वततेचा विचार विसरलो आणि त्यातूनच हवामान बदलासारखी समस्या निर्माण झाली आहे.

परिषदेत सहभागी सर्व तज्ज्ञांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या परिषदेतून मिळालेल्या सूचनांचा शासन निश्चितच पाठपुरावा करेल आणि महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धनासाठी ठोस पावले उचलली जातील. आपले राज्य स्वच्छ,समृद्ध आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील,असे मुख्यमंत्री म्हणाले.

या दोन दिवसीय परिषदेत विविध वैज्ञानिक सत्रे, संशोधन आणि नवकल्पनांचे सादरीकरण झाले असून या क्षेत्रातील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञांनी भविष्यासाठी धोरणात्मक दिशा मांडली.

# माकणी थोर येथे मनोज जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**प्रशासनाकडून जय्यत तयारी; श्री हनुमान आराधना सोहळ्यानिमित्त भाविकांशी साधणार संवाद**



**निलंगा/मोईज सितारी :** निलंगा तालुक्यातील माकणी थोर येथे आयोजित 'जागृत देवस्थान श्री हनुमान आराधना' कार्यक्रमासाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. येत्या १० तारखेला, मंगळवारी ४ वाजता होणाऱ्या या भव्य सोहळ्यासाठी लातूर जिल्ह्यासह संपूर्ण परिसरात मोठी उत्सुकता असून प्रशासकीय पातळीवरही जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

निलंगा तालुक्यातील येथील प्रसिद्ध व्यापारी पिंटू सगरे यांच्या वतीने या भव्य आराधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मनोज जरांगे पाटील हे उपस्थित भाविक आणि नागरिकांशी संवाद साधणार आहेत. एका बाजूला आध्यात्मिक वातावरण आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक चळवळीचे केंद्रबिंदू असलेले जरांगे पाटील यांची उपस्थिती, यामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या सोहळ्याला लातूर जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यांतूनही मोठ्या प्रमाणात जनसमुदाय येण्याची शक्यता आहे. ही गर्दी लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने माकणी थोर येथे चोख बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. वाहतूक कोंडी होऊ नये आणि शांतता सुव्यवस्था राखली जावी, यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

**लातूर जिल्ह्यात मोठी जय्यत तयारी**

या आराधना कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सध्या माकणी थोर परिसरात स्वागताचे फलक, भव्य मंडप आणि पार्किंगची व्यवस्था करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आगमनामुळे मराठा समाज आणि सामान्य नागरिकांमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# रेणापूर येथील सा.बां. उपविभागाच्या अद्यावत इमारतीसाठी २ कोटी मंजूर

## भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिलेली माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या नवीन अद्यावत कार्यालय इमारत बांधकामासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपयाची मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत विविध कामांना गती मिळावी सदरील विभागाच्या कार्यालयाची इमारत अद्यावत सुसज्ज व्हावी यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कार्यालय इमारत नव्याने बांधकाम करण्यासाठी १ कोटी ९३ लाखाची तरतूद केली असल्याचे जाहीर केले.



रेणापूर येथे सध्या असलेली सार्वजनिक बांधकाम उपविभागाची दोन मजली इमारत अत्यंत जीर्ण झाली असून अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपये खर्चाच्या नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीत उपविभागीय अधिकारी यांचे कक्ष, शाखा अभियंता यांचे कक्ष, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येणार असून सर्व सोयीनेयुक्त अशी एक मजली भव्य वास्तू उभारण्यात येईल अशी ही माहिती आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

## प्रभात किरणे

नसे कायम,पद पैसा
प्रतिष्ठा जरी मिळाले
सोडू नये नम्रता मुखी
गोडवाणी,जोडूनिया मन
एक रूप होऊनी,
जगावे सर्वजण
- इंजि. नागनाथ कलवले

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



महिलांना समान संधी मिळतील असा समाज निर्माण करावा - राष्ट्रपती

## चिमटा दयाचा



लातुरात पोलीसांची करडी नजर असल्याने टवाळखोरांची संख्या कमी झाली आहे ! अशीच पोलीसांची वचक असणे काळाची गरज आहे!!

# दशनाम गोसावी समाज लातूर यांच्यावतीने राज्यस्तरीय महिला गौरव सोहळ्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** 'जिच्या हाती घर-संसार आणि कर्तृत्वाचीही धुरा, तिचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान' या हेतूने आणि 'महिला सक्षम तर समाज सक्षम' या विचारप्रवाहातून दशनाम गोसावी समाज लातूर यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त गोसावी समाजातील प्रशासकीय सेवेतून समाजाला दिशा देणाऱ्या, राजकीय क्षेत्र गाजविणाऱ्या, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या, व्यावसायिक क्षेत्रातून उद्योग-व्यवसायातून आर्थिक स्वावलंबनाचा वसा घेऊन इतरांना रोजगार देणाऱ्या, सामाजिक क्षेत्रात समाजसेवेतून मानवतेची सेवा करणाऱ्या, वैद्यकीय क्षेत्रात आरोग्यसेवेचे कार्य करणाऱ्या, क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळविणाऱ्या, न्यायदानाच्या व्यासपीठावर महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या विधी क्षेत्रातील व विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा राज्यस्तरीय गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम रविवार १५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे होणार आहे. या सोहळ्याचा मुख्य उद्देश समाजातील महिलांनी केलेल्या विविध क्षेत्रांतील योगदानाचा गौरव करणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि इतर महिलांसमोर त्या आदर्श प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व उभे करणे हा आहे. या सोहळ्यासाठी समाजातील सर्व स्तरातील मान्यवर आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिलांचा हा सन्मान सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन दशनाम गोसावी समाज लातूरचे डॉ. धर्मवीर भारती यांनी केले आहे.

गोसावी समाजातील महिला आज प्रत्येक क्षेत्रात आपली छाप सोडत आहेत. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे, ही केवळ परंपरा नसून ती आपली जबाबदारी आहे. यामुळे इतर महिलांनाही पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळेल.

## विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

**उदगीर/प्रतिनिधी :** हा दिवस केवळ महिलांचा सन्मान करण्याचा नाही, तर समाजातील विषमतेवर प्रश्न उपस्थित करून समानतेच्या दिशेने प्रत्यक्ष कृती करण्याचा आहे. मानव अधिकार संरक्षण समिती महाराष्ट्र च्या वतीने दिनांक ८ मार्च २०२६ रोजी शासकीय निमशासकीय महिला कर्मचारी, अधिकारी, डॉक्टर्स, वकील, घरकाम करणाऱ्या महिला, मजुरी करणाऱ्या महिला, कामगार महिला यांचा जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यांचा प्रतिवर्षाप्रमाणे सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या कर्तुत्वाच्या बळावर विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या महिलांचा सन्मान व गोरगरीब होतकरू महिलांना मदतीचा हात म्हणून गौरव नारीशक्तीचा हा उपक्रम राबविण्यात आला. माय माऊलींचा सन्मान मानव अधिकार संरक्षण समिती च्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व सक्रिय सहभाग व योगदान असलेल्या माता-भगिनींचा सन्मान करण्यात आला.

# पेंशन वाढीसाठी देशभरातील पेंशनधारक ९ मार्च रोजी दिल्लीतील जंतर मंतर वर करणार आंदोलन - जिल्हाध्यक्ष विलास पाटील

## लातूर जिल्ह्यातील सर्व पेंशनधारकांनी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र, राज्य सरकार च्या अधिकार क्षेत्रातील सहकारी साखर कारखाने, वीज मंडळ, एसटी महामंडळ, सहकारी बँक क्षेत्राती तसेच खाजगी क्षेत्रातील जवळपास ८१ लाख पेंशनधारक ईपीएस - ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या बॅनरखाली राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या नेतृत्वात पेंशनधारकांच्या सर्व रास्त मागण्या मान्य करुन घेण्यासाठी ९, १० व ११ मार्च रोजी दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर देशभरातील सर्व राज्यातील जिल्ह्यामधील पेंशनधारक मोठ्या संख्येने एकत्र येऊन आंदोलन करणार असल्याची माहिती ईपीएस - ९५ राष्ट्रीय संघर्ष समिती, लातूर जिल्हाध्यक्ष विलास पाटील यांनी दिली आहे.

पेन्शनधारक ईपीएस - ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या बॅनरखाली राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या नेतृत्वात ८ वर्षांपासून ४ सुत्री कार्यक्रम राबवण्यासाठी रस्त्यापासून संसद पर्यंत संघर्ष करत आहेत. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, सर्व पक्षाचे संसद सदस्यांकडे आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी पाठपूरावा करत आहेत. परंतू पेन्शनधारकांचा आवाज कोणी उचलत नाही. त्यांच्या मागण्या मान्य करण्यात येत नाहीत याचा रोष पेंशनधारकांमध्ये आहे.



देशभरातील सुमारे ८१ लाख पेंशनधारकांना ३० ते ३५ वर्ष सेवाकाळात पेंशन अंशदान ईपीएफओ मध्ये जमा केली आहे. तरी त्यांना सुमारे ११७१ रु पेंशन देण्यात येत आहे. मात्र कोणते ही अंशदान जमा न करणाऱ्यांना सरकार अनेक योजनांच्या माध्यमातून रेवडी वाटप करत आहे. सरकारच्या या अमानवी व्यवहार व पेंशनधारकांच्या हिताची जपवणुक न करण्याच्या धोरणारमुळे पेंशनधारकांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश निर्माण झाला आहे. यामुळे संसदेच्या दुसऱ्या भागातील बजट सत्रास सुरु होण्याच्या काळात म्हणजेच ९, १० व ११ मार्च रोजी दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर देशभरातील सर्व राज्यातील जिल्ह्यांमधील पेंशनधारक मोठ्या संख्येने एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत.

पेंशनधारकांच्या या निर्णायक आंदोलनात लातूर जिल्ह्यातील सर्व पेंशनधारकांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष विलास पाटील यांनी केले आहे.

पेन्शनधारकांच्या प्रमुख मागण्या

१. कमीत कमी ७५०० मासीक पेंशन व महागाई भत्ता देण्यात यावा.

२. पेंशनधारक पती पत्नीला मोफत आरोग्य सेवा देण्यात याव्यात.

३. सुप्रीम कोर्ट च्या ४-११-०२२ निर्णयानुसार सर्व पेशनधारकांना जास्तीत जास्त समान पेंशन देण्यात यावी.

४. ईपीएस-९५ योजना पासून वंचीत राहिलेल्या पेंशनधारकांना ५००० रु प्रति महिना पेंशन देण्यात यावी.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शिक्षणात बदलाची गरज

शिक्षणात बदलाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रीय विचाराच्या शिक्षणाची मोठी गरज आहे. देश छोटा असला तरी चालले मात्र देशातील माणसे हे चिवट असले पाहिजेत. मुळात आपल्या देशातील नागरिक कष्ठाळू आहेत मात्र त्यांच्याअंगी राष्ट्रप्रेमाची भावना कमी आहे. यासाठी काय करावे तर शिक्षणात बदलाची गरज आहे. इतर समाज हा धार्मिक शिक्षण देतो. त्यामुळे कट्टर धार्मिकता निर्माण होते. वेळेच्यावेळी प्रार्थना करणे, एक दुसऱ्याला समावुन घेणे असा प्रयत्न केला जातो. चांगले गुण अनुकरणीय असतात, त्याचे अनुकरण केले पाहिजे. आज युद्ध चालू आहे ते दिर्घ काळ चालले असे वाटत नाही. या युद्धात इराण हा अमेरिका-ईस्त्राईला सडेतोड जबाब देत आहे. देशाची संपत्ती ही देशातील मजबुत, धाडसी नागरिक असतात हे कदापी विसरता येत नाही. देशातील नागरिक जर राष्ट्राभिमानी असतील तर त्याला डवचण्याची हिंमत कोणाला येत नाही. राष्ट्रीय विचार निर्माण करण्याचे एकमेव सामर्थ्य हे शिक्षणात आहे. भारतीय प्राचीन काळी वैदिक गुरुकुल पद्धती होती. त्यामुळे सर्व प्रकारचे ज्ञान मिळत होते. सर्वप्रकारची माहिती दिली जात होती. आत्मसंरक्षणाचे धडे दिले जात होते. एखादेवेळी संकट आले तर कशा प्रकारे ते परतावुन लावायाचे याचे ज्ञान दिले जात असते. शिक्षण हे घरापासून दूर नदीच्या काढी व झोपडीत असत. आता एसीमध्ये शिक्षण घेतले जाते. आलिशान इमारतीत ज्ञानार्जन होते. तरी समोरच्याबरोबर मुकाबला करण्यात घाबरले जाते. दोन हात करण्यात हातबल कशासाठी? याचा विचार केला पाहिजे. देशात सर्वात महत्वाचे म्हणजे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे हे शिक्षणातून सक्तीने दिले पाहिजे. सध्याला वृत्तपत्रातून ज्या मुली किंवा महिलेवरील अत्त्याचाराच्या बातम्या वाचायला मिळातात त्यावेळी झाशीची राणीची आठवण होते. जिजाऊमातेची होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवीची आठवण होते. अनेक राण्या होवून गेल्या त्यांनी मोगलाशी दोन हात केला. ब्रिटीशा विरोधात लढल्या. देशाला स्वराज्य मिळाल्यानंतर महिला आबला का बनल्या! यामागील कारणे म्हणजे जे आलिकडे ज्ञान दिले जाते ते भारतीय नाही तर मेकालेची शिक्षण पद्धतीचा आवलंब करीत आहोत. ज्या शिक्षणामुळे शेकडो तरूण देशासाठी प्राण त्याग करण्याची हिंमत निर्माण झाली. स्वातंत्र्याच्या युद्धात सर्वार्पन केले. आज अशी तरूण पिढी निर्माण का होत नाही किंवा का निर्माण केली जात नाही असा प्रश्न निर्माण होतो. यामागील कारणे कोणती असतील तर शिक्षणात जे सामर्थ्य असावयास पाहिजे ते दिसून येत नाही. देशात सर्व काही निर्माण करता येते मात्र राष्ट्रीय प्रेम निर्माण करावे लागते. त्यासाठी प्रयत्न करावे लागते. आज राष्ट्रीय विचाराची शिक्षण पद्धती निर्माण करणारे माणसे नाहीत का? असा विचार समोर येतो. मुलीवर अत्त्याचारच्या घटनेत वाढ होत आहे. मानसिकता बदलली आहे. गर्भात असताना अभिमन्यू हा चक्रव्युह तोडण्याचे शिक्षण प्राप्त करू शकतो तर आजच्या युवकास तसे ज्ञान देण्यात माता कमी पडल्या का, असा प्रश्न निर्माण होतो. सर्वात महत्त्वाचे ज्ञान आहे ते मिळविले पाहिजे. आत्मसात केले पाहिजे. कोणतेही ज्ञान मिळविण्यासाठी कष्ठ घ्यावे लागतात. त्याच प्रमाणे भारताची शिक्षण पद्धती सर्वश्रेष्ठ होती. जगात आयुर्वेदाचे ज्ञान घेतले जाते. भारतीयांचे ज्ञानाला तोड नाही. ज्ञान देणारे हे ऋषीमुनी होते. निस्वार्थी विचाराने ज्ञानार्जन करीत होते. गुरू दक्षणा देण्याची वेळ आली तर राष्ट्रासाठी काय करणार असा विचार करून गुरूदक्षणाच्या बदल्यात राष्ट्रसेवेचे व्रत घेतले जात होते. जगात असे काही देश आहेत की, अमेरिकेला सुद्धा जुमानत नाहीत. इराण हा लहान देश असून तो अमेरिकेला मेटकुटीला आणल्याचे दिसून येत आहे. देश म्हणजे दगड-धोंडे किंवा आलिशान बंगले नाहीत तर देशातील कणखर जनता आहे. जे राष्ट्रावर संकट आल्यावर दोन हात करण्यात तयार असते. ते राष्ट्रच जीवंत समजले जाते. भारतात तसे बरे नागरिक आहेत. जम्मूकाश्मीरमधून पंडितांना हाकलताना कोणीही मदत केली नाही. परत पुन्हा बस्तान बसविण्याचा विचार देखिल करीत नाहीत. जर भारतावर संकट आल्यावर ते खरेच धावून येतील असे वाटत नाही, यामागील कारण म्हणजे अनेक जाती, मत व पंथाचे नागरिक राहातात. त्यांना आपली जाती, मत व पंथाचा विचार करतात. मर्यादित विचाराने प्रेरीत होवून वागले जाते हे योग्य नाही. पहिल्यांदा राष्ट्र हेच सर्वस्व मानले पाहिजे. भारताचा इतिहास पाहिला तर भारतीयांना धोक्याने फसविले हे उघड आहे. भारतीय हे कोणावरही विश्वास ठेवतात. त्यांना ज्ञान नसते कोण आपला आहे? त्यामुळे धोका होतो. राजा पृथ्वीराजला धोक्याचा शिकार व्हावे लागले. अनेक भारतीय राजाला धोक्याचा शिकार व्हावे लागले. पुन्हा धोका भारतीयाना बसू नये यासाठी खरा इतिहास शिकविला पाहिजे. अनेक बाबी चुकीच्या शिकविल्याचा परिणाम आज भोगावा लागत आहे. भारतीयांचा इतिहास गौरवशाली आहे. जो जाणून घेतला पाहिजे. सध्याला आपल्याला काय करायाचे या विचारात वाढ झाली. भारतातच भारतीयांना फसविणारे कोण आहेत. मुली का सुरक्षित नाहीत याचा विचार केला जात नाही. त्यामुळे पहिल्यावर्गापासून मुलभूत ज्ञान दिले पाहिजे. भारतीयांना सामार्थ्यवान बनविले पाहिजे. इराणी आज अमेरिकेला घाबरत नाहीत तर तोडीसतोड उत्तर देत आहेत. त्यामुळे कौतुकास प्राप्त आहेत. फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून विश्वनिर्माण करण्याचे सामर्थ्य नागरिकात असले पाहिजे. हे ज्ञान शिक्षणातून देवू शकते. शिक्षणातून आत्मसात करता येवू शकते हे लक्षात घेतले पाहिजे. शिक्षणावर जोर का द्यावा तर शिक्षणाच्या माध्यमातून क्रांतीकारी बनू शकतो. त्याला अन्याय, अत्त्याचार करणाऱ्याविषयी चिड निर्माण होवू शकते. जे काही क्रांतीकारक निर्माण झाले ते गुरूच्या शिक्षणामुळे, गुरुकुलीय ज्ञानामुळे! तेंव्हा शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येते, त्यामुळे शिक्षण राष्ट्रीय विचाराचे, राष्ट्रीय प्रेम वाढविणारे मिळाले तर अनेक समस्या सुटतील. चुकीच्या बाबीचा जर आवलंब करीत राहीलो तर चुकीचे घडणार आहे. भारतीय परंपरा व संस्कृतीचा विचार करून शिक्षणात बदलाची गरज आहे. शिक्षण राष्ट्रप्रेम वाढविणारे असावे हे सतत लक्षात घेतले पाहिजे.

# शिक्षणातून सशक्तीकरण: मुलींच्या उच्च शिक्षण शुल्कमाफीमुळे समावेशक तंत्रशिक्षणाची नवी क्रांती

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील



यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:। याप्रमाणे ज्या समाजात महिलांचा सन्मान होतो, तिथेच प्रगती नांदते. जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. हा केवळ एक औपचारिकता म्हणून साजरा करण्याचा दिवस नाही, तर महिलांच्या अफाट कर्तृत्वाचा, त्यांच्या संघर्षाचा आणि समाजाच्या जडणघडणीत त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्याचा हा दिवस आहे. आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात महिलांचे शिक्षण, त्यांचे तांत्रिक कौशल्य आणि त्यांचे नेतृत्व हे केवळ एका कुटुंबाच्या प्रगतीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते संपूर्ण राष्ट्राच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वपूर्ण आधारस्तंभ बनले आहे. त्यामुळेच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींना समान संधी देणे आणि तंत्रशिक्षणात त्यांचा सहभाग वाढविणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे.

माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत २०४७' चा संकल्प मांडला आहे. भारताला जगाची ज्ञानशक्ती (घपुेश्रशवसश डीर्शिीुशिी) बनवण्यासाठी महिलांची बुद्धिमत्ता, त्यांची सर्जनशीलता आणि त्यांचे तांत्रिक कौशल्य यांचा उपयोग करून घेणे महत्वाचे आहे. जेव्हा आपण 'विश्र्वगुरू' भारताचा विचार करतो, तेव्हा त्याचा अर्थ केवळ आर्थिक प्रगती नसून ती शैक्षणिक आणि सामाजिक समतेवर आधारित प्रगती असते. देश आज प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. या ऐतिहासिक वाटचालीत महिलांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा घटक आहे. जेव्हा महिलांचे शिक्षण, त्यांचे उपजत कौशल्य आणि त्यांची सर्जनशीलता यांचा राष्ट्रनिर्मितीसाठी योग्य उपयोग होईल, तेव्हाच देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक विकासाला खऱ्या अर्थाने नवे बळ मिळेल. म्हणूनच शिक्षण क्षेत्रात 'स्त्री-पुरुष समानता' केवळ कागदावर न ठेवता ती प्रत्यक्ष व्यवहारात प्रस्थापित करणे, हे आजचे सर्वात मोठे राष्ट्रीय कर्तव्य आहे असे मी मानतो.

महाराष्ट्र हे देशाला दिशा देणारे, सामाजिक सुधारणांचे आणि प्रगत विचारांचे अग्रगण्य राज्य राहिले आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची ज्योत पेटवून समाज परिवर्तनाची नवी दिशा दिली त्या थोर परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे. याच भूमिकेतून महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून, ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत आहे, अशा सर्व पात्र मुलींना उच्च व तंत्रशिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १००% शिक्षण शुल्क (ढीळींळेप ऋशश) आणि परीक्षा शुल्क (एरा ऋशश) माफ करण्याचा एक ऐतिहासिक आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागासह वैद्यकीय, कृषी, आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या शुल्क सवलतीचा लाभ आता ५० टक्क्यांवरून थेट १०० टक्के करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू झालेला हा निर्णय राज्याच्या शैक्षणिक इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला आहे.

या निर्णयामुळे अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, बीबीए, बीसीए, एमसीए यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे मागे राहणाऱ्या हजारो मुलींसाठी उच्च शिक्षणाचे दरवाजे उघडे झाले आहेत. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत आहे, अशा सर्व पात्र विद्यार्थिनींना आता पूर्णतः शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क माफी मिळत आहे. हा निर्णय केवळ एक सरकारी योजना नसून, तो सामाजिक न्याय आणि महिला सशक्तीकरणाचा एक व्यापक सामाजिक जाहीरनामा आहे.

पूर्वी या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुलींना केवळ ५० टक्के सवलत मिळत होती, परंतु आकडेवारीनुसार मुलींचा प्रवेशाचा दर ३६ टक्क्यांवरच अडकला होता. यावरून हे स्पष्ट झाले की, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींसाठी व्यावसायिक शिक्षण हे अजूनही एक मोठे आर्थिक आव्हान होते. पालकांना निम्मी फी भरणेही कठीण जात होते. नेमकी हीच अडचण ओळखून शासनाने १०० टक्के शुल्कमाफीचा धाडसी निर्णय घेतला. माझा असा ठाम विश्र्वास आहे की, जेव्हा एक मुलगी शिकते, तेव्हा केवळ ती सुशिक्षित होत नाही, तर तिचे संपूर्ण कुटुंब आणि पर्यायाने समाज प्रगत होतो. शिक्षण ही केवळ वैयक्तिक प्रगतीची वाट नसून ती समाजाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे.

या योजनेचे अत्यंत सकारात्मक आणि उत्साहवर्धक परिणाम आता दिसू लागले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांमध्ये सुमारे २८ हजार अधिक मुलींनी प्रवेश घेतला, तर २०२५-२६ मध्ये ही संख्या जवळपास ४८ हजारांनी वाढली आहे. तांत्रिक शिक्षणाकडे मुलींचा हा वाढता कल समाजातील बदलत्या मानसिकतेचे आणि मुलींच्या वाढत्या आत्मविश्र्वासाचे जिवंत प्रतीक आहे. विशेषतः ग्रामीण भागात या योजनेचा प्रभाव अभूतपूर्व आहे. तंत्रशिक्षण हे ग्रामीण मुलींसाठी आर्थिकदृष्ट्या अशक्य मानले जात होते, पण शुल्कमाफीमुळे अभियांत्रिकी आणि संगणकशास्त्राकडे ग्रामीण विद्यार्थिनींची ओढ प्रचंड वाढली आहे. आकडेवारीनुसार, शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील मुलींच्या प्रवेशात ४५ टक्क्यांहून अधिक मोठी वाढ झाली आहे.

ग्रामीण भागातील या बदलामुळे गावागावांत मुलींचेही करिअर घडू शकते असा एक नवा आत्मविश्र्वास निर्माण झाला आहे. या वाढत्या प्रवेशांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही नवी चालना मिळाली आहे. महाविद्यालयांच्या परिसरात नवीन वसतिगृहे, भोजनालये आणि इतर सेवा सुविधांमध्ये वाढ झाली असून, त्यातून महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. हे ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिक बदलाचे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

महाराष्ट्र शासनाची ही मुलींच्या उच्च शिक्षणाची शिक्षण शुल्कमाफी योजना म्हणजे महिलांच्या शैक्षणिक आणि सामाजिक सशक्तीकरणाची एक व्यापक चळवळ आहे. या माध्यमातून 'वुमन-लेड डेव्हलपमेंट' (थोशप-ङशव ऊर्शींशश्रेशिपीं) ही संकल्पना आपण प्रत्यक्ष साकारत आहोत. जेव्हा महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी तंत्रज्ञानाने सज्ज होऊन बाहेर पडेल, तेव्हा ती विकसित भारताच्या निर्मितीत आपले मोलाचे योगदान देईल.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मी सर्व विद्यार्थिनींना आवाहन करतो की, ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या जोरावर आपले भविष्य घडवा. महाराष्ट्र शासन आपल्या स्वप्नांना बळ देण्यासाठी खंबीरपणे पाठीशी उभे आहे. सशक्त, आत्मनिर्भर आणि प्रगत महिलांचे नेतृत्व निर्माण करून आपण महाराष्ट्राला आणि देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊया. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी सक्षम, स्वावलंबी आणि उच्चशिक्षित व्हावी, हेच आमचे स्वप्न आहे. सर्व माता-भगिनींना जागतिक महिला दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

# युडीसीपीआर कायद्यामुळे विकासक, ग्राहक व प्रशासनाची सोय-प्रकाश बुक्के

## लातूर क्रेडाईची एकदिवशीय कार्यशाळा संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** शासनाने युडीसीपीआर हा नवीन कायदा अंमलात आणल्याने बांधकाम व्यावसायीकांसोबतच ग्राहक व प्रशसनाची किचकट, कालबाह्य व जुनाट, जाचक अटी यातून सुटका होणार असून हा कायदा सर्वांच्या सोयीचा असल्याचे मत महाराष्ट्राचे नगररचना विभागाचे माजी संचालक प्रकाश बुक्के यांनी व्यक्त केले. लातूर क्रेडाईच्या वतीने आयोजीत एक दिवशीय कार्यशाळेत बोलताना त्यांनी उपस्थित बांधकाम व्यावसायीक, इंजिनिअर्स, महापालिका प्रशासनातील अधिकारी यांना मार्गदर्शन केले.

बांधकाम व्यावसायीकांच्या मनात बराच शंका व काही तांत्रीक अडचणी या सातत्याने येत होत्या. लातूर क्रेडाईने नगररचना विभागाचे माजी संचालक प्रकाश बुक्के यांच्या उपस्थितीत लातुरात एक सेमीनार आयोजीत करण्याची ईच्छा अनेक वर्षांपासूनची होती. प्रकाश बुक्के यांचे काम हे केवळ राज्यात नव्हे तर देश पातळीवर चर्चिले गेल्याने त्यांच्या मार्गदर्शनाची बिल्डर्ससोबतच प्रशासनातील अधिकाऱ्यांना उत्सूकता होती. यावेळी त्यांनी चित्रफीतीच्या माध्यमातून सादरीकरण करून प्रत्येक विषयाला स्पर्श करत त्यातील सूचना व अडचणी अतिशय सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्याने अनेक बांधकाम व्यावसायीकांचे समाधान झाले. तसेच भविष्यात येणाऱ्या सर्व अडचणी दूर झाल्या. बांधकाम व्यावसायीकांसोबतच महापालिका आयुक्त मानसी मीना यांनी हा सेमीनार पूर्णपणे उपस्थित राहून बांधकाम व्यावसायीकांना भविष्यातील अडचणी व त्यावरील उपाययोजना यावर मुद्देसूद मांडणी त्यांनी स्वतःही समजून घेतली. बांधकाम व्यावसायीक म्हटले की ग्राहकांच्या व प्रशासनाचा बघण्याचा दृष्टीकोण वेगळा असतो त्याबाबत त्यांनी नवीन नियमावलीनुसार त्या कितपत सोप्या व सुटसुटीत असल्याचे समप्रमाण दाखवून दिले. तसेच बांधकाम व्यावसायीकांना घ्यावयाचा बांधकाम परवाना तसेच विकसीत करण्यात येत असलेल्या इमारती संदर्भात येणाऱ्या अडचणींची तपशीलवार माहिती त्यांनी यावेळी दिली. सर्वसामान्यांना स्वतःत घरे कशी उपलब्ध करून देता येतील यासाठी सरकारने सोयीच्या उपाययोजना केल्या असून बांधकाम व्यावसायीकांमुळे शहराची तसेच त्या परिसराचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होते. सरकारने पुर्वीचे जुनाट कायदे रद्द केले असून याचा फायदा बिल्डर्ससोबत सर्वसामान्यांनाही होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महापालिका आयुक्त मानसी मीना लातूर क्रेडाईच्या कामाबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणाल्या की, लातूर क्रेडाईने हा अत्यंत चांगला उपक्रम राबविला असून शहराचा नियोजनबद्ध विकास होणे गरजेचे आहे. लातूर शहराच्या विकासात बिल्डर्संचे महत्वपूर्ण योगदान आहे. कोणत्याही व्यवसायामध्ये पारदर्शकता असणे गरजेचे आहे. ती पारदर्शकता ठेवण्याचे काम सर्वांनी करावे, असे सांगून महापालिका प्रशासन लातूर क्रेडाईच्या सतत पाठीशी राहून त्यांना खंबीर साथ देईल, असे आश्वासन देत क्रेडाईच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी दिप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरूवात झाली. यावेळी व्यासपीठावर नगररचना विभागाचे माजी संचालक प्रकाश बुक्के, महापालिका आयुक्त मानसी मिना, नगररचना अधिकारी अनिकेत महाजन, लातूर क्रेडाई अध्यक्ष उदय पाटील, माजी क्रेडाई अध्यक्ष जगदीश कुलकर्णी, क्रेडाई सचिव विष्णू मदने, वुमन विंगच्या अध्यक्षा सौ. रश्मी बेळंबे, क्रेडाईचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य धर्मवीर भारती यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष हत्ते यांनी केले तर महेश नावंदर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. क्रेडाई अध्यक्ष उदय पाटील यांनी लातूर क्रेडाईच्या कामाकाजाबाबत प्रास्तावीक करून क्रेडाईच्या कामाचा अहवाल उपस्थितांसमोर मांडला. या सेमीनारसाठी मोठ्या प्रमाणावर लातूर जिल्ह्यातील बिल्डर्स, इंजिनिअर्स, बांधकाम व्यावसायीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रेडाईचे माजी अध्यक्ष व ओबी टीम, क्रेडाई वुमन युथ विंगच्या सदस्याने परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराला किनगाव येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

### समाधान शिबिरातून शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांना गतिमान प्रशासकीय सेवा उपलब्ध - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

### समाधान शिबिरातून नागरिकांच्या समस्या, तक्रारींचे समाधान होईल





**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळवून देण्यासाठी सर्व महसूल मंडळांमध्ये समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरामुळे नागरिकांना वेगवान प्रशासकीय सेवा मिळतील, गतीशील प्रशासनाचे हे एक उत्तम उदाहरण असून, नागरिकांनी आपल्या समस्या आणि तक्रारी या व्यासपीठावर मांडून समाधान करून घ्यावे, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते झाले. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगारकर, जिल्हा परिषद सदस्य प्रतिक्षा गुट्टे, अश्विन नागराळे, पंचायत समिती सदस्य सुरेखा मुंडे, अयोध्या केंद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, किनगावचे उपसरपंच विठ्ठल बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे. महसूल विभागाच्या माध्यमातून सातबारा दुरुस्ती, शेत रस्ते व पाणंद रस्ते विषयक मोहीम राबविण्यात येत आहे. त्याबाबत आवश्यक माहिती व मार्गदर्शन शिबिरात मिळणार आहे. यासोबतच विविध शासकीय विभागांच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्टॉल उभारण्यात आले असून नागरिकांनी या स्टॉल्सला भेट द्यावी. महसूल विभागाकडून मिळणाऱ्या विविध दाखल्यांची, आधारकार्ड तयार करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याचाही लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन सहकार मंत्री श्री. पाटील यांनी केले.

महसूल विभाग अधिक लोकाभिमुख : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

महसूल विभाग हा सर्वसामान्य नागरिकांशी थेट नाळ जुळलेला विभाग आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत हा विभाग अधिक लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. नागरिकांना एकाच छताखाली महसूल विभागाच्या विविध सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देऊन शासनाच्या योजना जनतेच्या दारी पोहचवण्याचा प्रयत्न समाधान शिबिराच्या माध्यमातून होत आहे, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी शासन विविध योजना राबवत असून, महिलांनी त्याचा लाभ घेऊन सक्षम बनावे. तसेच युवकांनी कौशल्य विकास प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगाराकडे वळावे. कृषी आणि व्यवसायामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी यावेळी अकृषिक (एनए) परवानगीबाबतच्या नवीन नियमांची माहिती दिली. आता अकृषिक परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच आता अकृषिक परवानगी म्हणून ग्राह्य धरली जाईल. तसेच दरवर्षी भरावा लागणारा अकृषिक कर आता एकदाच भरावा लागणार आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अहमदपूरच्या तहसीलदार उज्ज्वला पांगारकर यांनी केले. अहमदपूर तालुक्यातील सर्व महसूल मंडळात समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याची सुरुवात किनगावपासून आज झाली आहे. महसूल विषयक विविध दाखले, सेवांचा लाभ शिबिराच्या माध्यमातून देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

विविध प्रमाणपत्रे, योजनांच्या लाभ पत्राचे वितरण

किनगाव येथील समाधान शिबिरामध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते नागरिकांना विविध प्रमाणपत्रे आणि शासकीय योजनांच्या लाभ पत्राचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. यामध्ये डिजिटल सातबारा, नव्याने नोंद आणि दुरुस्त करण्यात आलेले सातबारा, अंत्योदय कार्ड, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेचे मंजुरी प्रमाणपत्र, संजय गांधी योजना प्रमाणपत्राचे यावेळी वितरण करण्यात आले. तसेच महिला व बालविकास विभागामार्फत बेबी किट वाटप करण्यात आले. यावेळी विविध शासकीय विभागांच्या स्टॉल्सला मान्यवरांनी भेट दिली.

जागतिक महिला दिनाच्या पूर्वदिनी झालेल्या या शिबिरात मोहिब काद्री यांचे आर्थिक साक्षरता विषयावर व्याख्यान झाले. सूत्रसंचालन प्रा. रामलिंग तत्तापुरे यांनी केले, ग्राम महसूल अधिकारी अविनाश पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रंगपंचमी हा सण म्हणजे वाईट मतभेतांचा त्याग करणे



पहोळीच्या दुस-या दिवशी धूलिवंदन हा सण साजरा केला जातो. या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना अंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने अंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कै-याही मिळू लागतात. कै-या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात. अंगाला फासतात व नंतर स्नान करतात.

काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुस-या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्सा-हाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे.

रंगपंचमी (फाल्गुन वद्य पंचमी)

ीरपसररिपिलहराळवसंत ऋतूची चाहूल लागल्यामुळे या सुमारास झाडे नवीन पल्लवीने व विविध रंगी फुलांनी रंगीबेरंगी दिसत असतात. हवाही उष्ण झालेली असते. अशावेळी थंड पाणी अंगावर उडविणे सुखदायक असते. त्यामुळे रंगपंचमी हा सण सुरू झाला.

कुसुंबीच्या फुलांपासून काढलेल्या रंगाचे पाणी करून तसेच केशराचे पाणी करून ते एकमेकांच्या अंगावर उडविले जात असे. पेशवाईत तर हा सण शाही इतमामाने साजरा केला जात असे. रंगाच्या पिचका-या भरभरून हत्तीवरून गुलाल आणि इतर कोरडया रंगाची उधळण केली जात असे.

आजकाल विविध प्रकारचे रंग पाण्यात कालवून ते एकमेकांवर उडवितात. विशेषत: तरूण स्त्री-पुरुषांना एकत्र येण्याची व थट्टा-मस्करी करण्याची संधी या सणामुळे मिळते.

आजकाल एखाद्या हौदातील पाण्यात रंग टाकून एकमेकांना त्यात डुबवून हसत खेळत ह्या सणाची मजा लुटली जाते.

या सणासाठी विशेष असे पक्वान्न ठरलेले नाही.

कृष्ण गोपिकांसमवेत रंग खेळताना

रंगपंचमी हा एक भारतीय सण आहे. फाल्गुन कृष्ण पंचमी या तिथीला रंगपंचमी हा सण साजरा केला जातो.१ धूलिवंदनापासून सुरू होणाऱ्या वसंतोत्सवाला रंगपंचमीच्या दिवशी पाच दिवस पूर्ण होतात. रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण.२ या दिवशी एकमेकांना वेगवेगळे रंग लावून आनंदोत्सव साजरा केला जातो.३

भारतातील होळी उत्सवात रंग खेळताना

इतिहास

द्वापरयुगात गोकुळात बाल/कुमार कृष्ण आपल्या गोपाळ सवंगड्यांवर पिचकारीने रंगीत पाणी उडवीत असे व उन्हाची तलखी कमी करीत असे. तीच प्रथा आजही रंगपंचमीच्या रूपाने चालू आहे.१ मध्ययुगात संस्थानिक, राजे हे होळी आणि रंगपंचमी सण साजरा करीत असत.४५६ राधा आणि कृष्ण यांनी या दिवशी एकत्र रंग खेळण्याचा आनंद घेतला अशी धारणा आहे. या दिवशी कृष्णासह राधेची पूजाही केली जाते.७

महत्त्व

रंगपंचमी हा वसंत ऋतूशी संबंधित महत्त्वाचा सण आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीला हा सण साजरा केला जातो. उन्हाचा तडाखा कमी व्हावा आणि थंडावा मिळावा यासाठी एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्याची रीत आहे.८

स्वरूप-संपूर्ण भारतामध्येरंगपंचमीचा सण साजरा केला जातो.९

उत्तर प्रदेश-देशाच्या काही भागात या लोकप्रिय सणाला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. वसंत पंचमीच्या दिवशी बलराम मंदिरात या उत्सव-ाची सुरुवात होते. या दिवशी होळीशी संबंधित लोकगीते गायली जातात.८ व्रज प्रांतात कृष्ण आणि बलराम होळीच्या सणाचा आनंद घेत असत असे मानले जात असल्याने, उत्तर प्रदेशात होळीचा आनंद घेण्याला धार्मिक महत्त्वही आहे.८

हरियाणा-


या भागात दुलहंडी असे या उत्सवाला संबोधिले जाते. दीर आणि नणंद यांच्यासह रंगाच्या खेळाचा आनंद घेण्याची पद्धती येथे प्रचलित आहे.१०

मध्य प्रदेश-मध्य प्रदेशात होळीच्या निमित्त गायल्या जाणा-या गीतांना फाग असे म्हण-तात.११ राधा- कृष्ण, राम-सीता, शंकर-पार्वती या देवताना उद्देशून रचलेली फाग गीते प्रसिद्ध आहेत. या गीतांची उत्पत्ती बुंदेलखंड येथे झाली असे मानले जाते.१२ शिव मंदिरात जाऊन भाविक विशेष उत्सवी पूजा देवाला अर्पण करतात.

## निरोगी जीवनासाठी

निरोगी राहण्यासाठी समतोल आहार, नियमित व्यायाम (दररोज किमान ३० मिनिटे), पुरेशी झोप (७-८ तास), भरपूर पाणी पिणे आणि मानसिक तणावमुक्त राहणे अत्यंत गरजेचे आहे १, ६, १२। प्रक्रिया केलेले अन्न (ीलिर्शीशिव षेव), साखरेचे पदार्थ टाळा आणि आहारात फळे, भाज्या, कडधान्ये व पालेभाज्यांचा समावेश करा

येथे काही महत्त्वाच्या आरोग्य टिप्स आहेत: १. आहार आणि पोषण-संतुलित आहार: आहारात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि फायबरचा योग्य समतोल ठेवा पाणी: दिवसभरात पुरेसे पाणी प्या (२-३ लिटर), यामुळे चयापचय क्रिया चांगली राहते.नाश्ता: सकाळचा नाश्ता कधीही टाळू नका; तो सकस आणि पौष्टिक असावा.टाळायचे पदार्थ: जास्त साखर, प्रक्रिया केलेले पदार्थ, शीतपेये आणि फॅटी फूड्स कमी कराफ घरगुती उपाय: वातदोष संतुलित करण्यासाठी आहारात आले, लसूण आणि जायफळ यांचा वापर करा. २. शारीरिक व्यायाम-नियमित व्यायाम: दररोज वेगाने चालणे, योगासने, पोहणे किंवा कोणताही आवडीचा व्यायाम ३० मिनिटे करा सक्रियता: दिवसभरात सक्रिय राहा. लिफ्टऐवजी जिन्याचा वापर करा ३. जीवनशैली आणि झोप-पुरेशी झोप: दररोज रात्री ७ ते ८ तासांची शांत झोप घेतल्याने मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारते १, ६। नियमित तपासणी: वयानुसार नियमित आरोग्य तपासणी करून घ्या ४. मानसिक आरोग्य-तणावमुक्ती: योगा, ध्यान किंवा आवडीचे छंद जोप-ासा २। सकारात्मक विचार:



## शरद पवारच निश्चित....



महाविकास आघाडीने शरद पवार यांना उमेदवारी देताना दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबतच्या भूमिकेची शहानिशा करून घेतली. त्यामुळे विलीनीकरणाची चर्चा आता थांबली आहे.


महाराष्ट्रातून राज्यसभेवर पाठवायच्या सात जागांसाठी सातच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार हे स्पष्ट आहे. भाजपचे चार, शिवसेना शिंदे गटाचा आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचा प्रत्येकी एक असे महायुतीचे सहा आणि महाविकास आघाडीचे एकमेव उमेदवार शरद पवार यांच्या निवडीची औपचारिक घोषणा होणे बाकी आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटातून पार्थ पवार यांचे नाव आधीच निश्चित झाले होते. शिवसेना (शिंदे गटातून) ज्योती वाघमारे यांच्या खेरीज अन्य नावांचा विचार झाला होता. मात्र महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या उमेदवारीवर एकमत झाल्याने त्यांचा अनुभव आणि त्यांची राजकीय कारकीर्द लक्षात घेऊन त्यांच्या विरोधात निवडणूक टाळण्याचा निर्णय महायुतीने घेतला. भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि पक्षाच्या राष्ट्रीय स्तरावर सरचिटणीसपदाची जबाबदारी पार पाडणारे विनोद तावडे यांना राज्यसभेवर पाठवण्यात येत आहे. याखेरीज मायाताई इवनाते आणि रामदास वडकुले या काहीशा अपरिचित आणि नव्या चेहर्यांना भाजपने संधी दिली आहे. राज्यसभेवर जात असलेल्या ज्योती वाघमारे या दलित समाजातील पण उच्च विभूषित महिला असून, शिंदे गटाच्या प्रवक्तेपदाची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. आनंदराव अडसूळ आणि राहुल शेवाळे हे उमेदवारीसाठी इच्छुक होते. शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटातून प्रियांका चतुर्वेदी यांच्या उमेदवारीसाठी आदित्य ठाकरे शेवटपर्यंत आग्रही होते. काँग्रेसही आपला उमेदवार राज्यसभेत पाठवण्यासाठी आग्रही होती; मात्र सातव्या जागेसाठी महाविकास आघाडीत एकमत झाले नसते आणि निवडणूक झाली असती, तर कदाचित महायुतीनेच त्यात बाजी मारली असती! विधानसभेत महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे.

किंबहुना त्यांचे सहा उमेदवार निवडून आणल्यानंतरही त्यांची काही मते उरली असती. त्या आधारे महाविकास आघाडीची काही मते फोडून महायुतीने सातवी जागाही निवडून आणली असती. दोन वर्षांपूर्वीच्या विधान परिषदेच्या आणि राज्यसभेच्या निवडणुकीतील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अधिकचा उमेदवार निवडून आणण्याचा अनुभव लक्षात घेता महाविकास आघाडीने शरद पवार यांच्या नावावर एकमत करून शहा-णपणाचा निर्णय घेतला, असेच म्हणावे लागेल.

शरद पवारांची निवड

महाविकास आघाडीत पवार यांच्या नावावर एकमत झाल्यामुळे काँग्रेस आणि शिवसेनेने आपल्या जागेवरचा दावा सोडला. त्यामुळे मविआची एक जागा सुरक्षित झाली आणि राजकीय नाचक्की टाळता आली. शरद पवार यांच्या उमेदवारीला विरोध न करण्याची भूमिका भाजपने घेतली. त्यांच्या विरोधात महायुतीने सातवा उमेदवार दिला असता तर आघाडीकडे पुरेसे संख्याबळ असल्याने महायुतीचा उमेदवार पराभूत होण्याची शक्यता होती. पराभवाचा धोका पत्करण्यापेक्षा निवडणूक बिनविरोध करणे भाजपला राजकीय रणनीतीनुसार फायद्याचे ठरले. महाविकास आघाडीने शरद पवार यांना उमेदवारी देताना दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबतच्या भूमिकेची शहानिशा करून घेतली. त्यामुळे विलीनीकरणाची चर्चा आता थांबली आहे. भविष्यात शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीत जाण्याची शक्यता उर-लेली नाही, हे स्पष्ट झाले. शरद पवार यांचे वय आणि त्यांचे अलीकडचे आजारपण लक्षात घेता राज्यसभेत काम करण्यात त्यांना मर्यादा येणार हे उघड आहे. कदाचित पूर्वीसारखे ते प्रत्येक चर्चेत सहभागी होऊ शकणार नाहीत; पण देशाच्या किंवा राज्याच्या महत्त्वाच्या धोरणाबाबतच्या प्रश्नांवर त्यांचा अनुभव देशाला मार्गदर्शक ठरेल. शिवाय त्यांच्या दृष्टीने राज्यसभा हे त्यांच्या राजकीय शक्तीचे केंद्र ठरू शकते. महाविकास आघाडीला एकत्रित बांधून ठेवण्यासाठी त्यांनी राज्यसभेत असणे महत्त्वाचे आहे. त्यांची निवड ही त्यांच्या कामगिरीपेक्षा त्यांच्या अस्तित्वाचा संदेश देण्यासाठी अधिक आहे. राजकारणात मी या वयातही सक्रिय आहे, हाच संदेश त्यांनी त्यांच्या निवडीतून त्यांच्या कार्यकर्त्यांना दिला आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉक्टर लग्नाला दोन महिने झाले, पण शारीरिक संबंधात मी फारच कमी पडतो. मला तिचं समाधान करता येत नाही. मी फार आधीच संपतो. यामुळे मला आता रोज रात्री घरी जाण्याचीच भीती वाटते. आता तर माझ्यातलं पौरुषत्व संपल्यासारखं वाटतं.

## २ Joke — विनोद




अजय : माझे घड्याळ एक मिनिटसुद्धा मागे-पुढे जात नाही.
विजय : वा ! छान. कुठं विकत घेतलंस?
अजय : अरे कसलं छान, घेतल्यापासून बंदच आहे.

## ३ Message — संदेश



Banta dairy likh raha tha
"aaj meri behan ko baccha hone wala hai pata nahi ladka hoga ya ladki,
isliye mujhe ye bhi pata nahi ki me mama banunga ya mami".

## ४ Thought — सुविचार



पुष्कळ वेळा अबोल नजरही बोलकी असते.
– ओव्हिड


**संस्कृत सुभाषित**

**प्राणाः प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।**

**मराठीत अर्थ**

अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अव-ास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त




### मी सांगून सांगून थकलोय...; फायनलपूर्वी आर. अश्विन भारतीय गोलंदाजावर संतापला,

मुंबई-भारताने टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीत मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडचा ७ धावांनी पराभव करत फायनलमध्ये धडक मारली. आता रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात टीम इंडियाचा सामना न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे. मात्र इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात महागडे ठरलेल्या वरुण चक्रवर्तीवर माजी दिग्गज फिरकीपटू रविचंद्रन अश्विन याने जोरदार टीका करत इशाराही दिला आहे.इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात वरुण चक्रवर्ती याने ४ षटकांत ६४ धावा दिल्या आणि केवळ एक विकेट घेतली. हा टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासातील संयुक्तरीत्या दुसरा सर्वात महागडा बॉलिंग स्पेल ठरला. त्याने सनथ जयसूर्याच्या विक्रमाशी बरोबरी केली. जयसूर्याने २००७ मध्ये जोहान्सबर्ग येथे पाकिस्तानविरुद्ध ०६४ अशी कामगिरी केली होती. अश्विन याने सांगितले की, फलंदाज जर वरुणच्या स्पेलमध्ये सुरुवातीपासून आक्रमण करत असतील तर त्याचा त्याच्या आत्मविश्वासावर परिणाम होतो.लाइन-लेंथ आणि स्पीडमध्ये बदल गरजेचा...आर अश्विन म्हणाला की, फलंदाजांनी एखाद्या गोलंदाजाची धूलाई करणे ही सामान्य गोष्ट आहे. प्रत्येकाला माहीत आहे की आदिल रशीदकडे गुगली आहे.

### मोदी स्टेडियम टीम इंडियासाठी लकी नाही..; पाकिस्तानी

**अहमदाबाद**-अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे ८ मार्च रोजी आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ चा अंतिम सामना टीम इंडिया आणि न्यूझीलंड यांच्यात रंगणार आहे. या महत्त्वाच्या लढतीसाठी दोन्ही संघांचे खेळाडू आधीच अहमदाबादला पोहोचले आहेत. उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला, तर भारताने इंग्लंडवर ७ धावांनी रोमांचक विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा फायनलमध्ये धडक मारली. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष अंतिम सामन्याच्या पिचकडे लागले आहे.दरम्यान, पाकिस्तानचे माजी दिग्गज क्रिकेटपटू बसित अली याने आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर मोठं वक्तव्य केलं आहे. त्याच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना त्याने फायनल कोण जिंकणार याबाबत प्रतिक्रिया दिली.बासित अली म्हणाला, मफ्फायनल कोण जिंकणार हे कुणालाही आधी सांगता येत नाही. त्या दिवशी जो संघ चांगला खेळेल, तोच सामना जिंकेल.फ्फ अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम हे मैदान भारतीय संघासाठी लकी नाही, अशा चर्चाबाबतही त्यांनी प्रतिक्रिया दिली.

# भारत-न्यूझीलंड सामन्याच्या तिकिट दरात प्रचंड वाढ

अहमदाबाद : आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. उपांत्य फेरीत इंग्लंडचा पराभव करत भारताने सलग दुसर्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता विजेतेपदाच्या लढतीत टीम इंडियाचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. हा सामना ८ मार्च रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. त्यामुळे अंतिम सामन्याच्या तिकीटांपासून ते बुकिंग आणि स्टेडियममध्ये प्रवेशाच्या नियमांपर्यंत चाहत्यांमध्ये प्रचंड पाहायला मिळत आहे.अंतिम सामन्याची तिकिटे अधिकृतपणे आणि आयसीसीच्या पोर्टलवरून विकली जात आहेत. तिकीटांची प्रचंड मागणी असल्यामुळे सध्या बहुतांश कॅटेगरी सोल्ड आउट झाल्या आहेत. मात्र क्रिकेटप्रेमींसाठी अजूनही आशा कायम आहे. सामान्यतः मोठ्या सामन्यांपूर्वी २४ ते ४८ तास आधी काही तिकिटे पुन्हा विक्रीसाठी उपलब्ध केली जातात. मुंबईत झालेल्या उपांत्य फेरीच्या




सामन्यातही असेच पाहायला मिळाले होते. त्यामुळे ज्यांना अद्याप तिकीट मिळालेले नाही, त्यांनी अधिकृत वेबसाइट किंवा अ‍ॅपवर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला जात आहे.तिकीटांच्या किमतीबद्दल बोलायचे झाले तर स्टेडियममधील वरच्या स्टँडसाठी सुरुवातीची किंमत सुमारे ३,००० रुपयांपासून सुरू होते. तर प्रीमियम हॉस्पिटॅलिटी आणि क्लब लाउंज सीट्ससाठी सुमारे ५० हजार ते ७५ हजार रुपयांपर्यंत किंमत आहे.

अंतिम सामन्यासाठी सुरक्षेची कडक व्यवस्था करण्यात आली आहे. स्टेडियमचे गेट्स सायंकाळी ३:३० वाजल्यापासून उघडले जातील, तर सामना सायंकाळी ७ वाजता सुरू होईल. त्यामुळे प्रेक्षकांनी किमान ३ तास आधी स्टेडियमवर पोहोचण्याचा सल्ला देण्यात आला आहे, जेणेकरून सुरक्षा तपासणीसाठी पुरेसा वेळ मिळेल.स्टेडियममध्ये अनेक वस्तू नेण्यास मनाई असेल. पावर बँक, बॅग, पाण्याच्या बाटल्या आणि छत्री यांसारख्या वस्तूंवर पूर्ण बंदी असेल. प्रेक्षकांना फक्त मोबाईल फोन आणि वॉलेटच आत घेऊन जाण्याची परवानगी दिली जाईल. अहमदाबादच्या मोटेरा परिसरात असलेले नरेंद्र मोदी स्टेडियम हे जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट स्टेडियमपैकी एक आहे. येथे सुमारे १.३ लाख प्रेक्षक बसू शकतात. मोठ्या गर्दीमुळे मोबाईल नेटवर्कवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे डिजिटल तिकिट आधीच डाउनलोड करून ऑफलाइन सेव करून ठेवणे आवश्यक आहे.

# न्यूझीलंडच्या कर्णधाराने टीम इंडियाला दिली २०२३ वर्ल्ड कपसारखी धमकी



दिल्ली-टी २० वर्ल्ड कप २०२६ चा अंतिम सामना हा अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. ८ मार्च रोजी भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात हा सामना खेळवला जाणार असून याकडे सर्वांचं लक्ष असणार आहे. तीन वर्षापूर्वी याच मैदानात झालेल्या वनडे वर्ल्ड कप २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला होता. मात्र आता हा पराभवाचा इतिहास पुसण्यासाठी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टीम इंडिया रविवारी मैदानात उतरणार आहे. मात्र न्यूझीलंडचं लक्ष सुद्धा टी २० वर्ल्ड कपची ट्रॉफी जिंकण्याकडे असणार आहे. शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर याची पत्रकार परिषदे पार पडली.

**शांत पण अतिशय ठाम :**

न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने फायनलमध्ये भारत विरुद्ध मैदानात उतरण्यापूर्वी पत्रकारांशी बातचीत केली. यावेळी त्याने पत्रकारांशी बोलताना त्यांनी शांत पण अतिशय ठाम स्वर स्वीकारला. त्यांनी स्पष्ट केले की यजमान संघाचा सामना करताना प्रचंड दबाव असूनही, त्यांचा संघ शांतता राखण्यावर आणि खेळातील महत्त्वाच्या क्षणांचा फायदा घेण्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करतोय. सँटनर म्हणाला की यावेळी भारतीय संघावरच नाही तर न्यूझीलंड संघावर सुद्धा दबाव आहे.

**न्यूझीलंड विरुद्ध संघाला घाबरत नाही :**

वर्ल्ड कप जिंकण्याच्या उद्दिष्ट ठेवण्याबाबत मिचेल सँटनर म्हणाला की, 'मला ट्रॉफी जिंकायला हरकत नाही. जेव्हा तुम्ही या सध्याच्या संघाकडे आणि आमच्या भूतकाळाकडे पाहता तेव्हा आम्ही या मोठ्या स्पर्धांमध्ये खूप सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे'.

सँटनरने पुढे स्पष्ट केलं की, 'न्यूझीलंडच्या यशाचे रहस्य म्हणजे ते परिस्थिती किंवा विरोधी संघाच्या ताकदीला घाबरत नाहीत. त्यांचे एकमेव लक्ष संपूर्ण प्रामाणिकपणे एक संघ म्हणून त्यांचे काम करण्यावर आहे'. सँटनरने विनोदाने पण स्पष्टपणे सांगितले की, 'एकदा तरी भारतीय चाहत्यांचं मन मोडून वर्ल्ड कप ट्रॉफी उचलणे त्यांच्यासाठी आनंददायी असेल'.

**काही मन मोडणं चांगलं असेल... :**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या या फायनल सामन्यात टीम इंडियाविरुद्ध खेळणं हे आव्हानात्मक असेल. मिचेल सँटनरने त्याचा संघ या वातावरणासाठी पूर्णपणे तयार आहे असं म्हटलं. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर, 'मला वाटतं की आमचं ध्येय गर्दीला शांत करणं आहे. काहींची मने मोडणं चांगलं होईल. या संपूर्ण वर्ल्ड कपमध्ये, आम्ही पाहिले आहे की अनेक संघ समान पातळीवर आहेत आणि सामन्यांचा निकाल अनेकदा छोट्या छोट्या क्षणांवर अवलंबून असतो. जर आपण त्या क्षणांचा फायदा घेतला तर आपण दुसऱ्या मोठ्या संघाविरुद्ध निराशाजनक कामगिरी करू शकतो'. वनडे वर्ल्ड कप २०२३ च्या फायनलपूर्वी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने म्हटले होते की, 'भारतीय फॅन्सना शांत करून त्यांना खूप आनंद होईल'. ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड कप २०२३ फायनलमध्ये भारताचा पराभव करून तसे करून सुद्धा दाखवले होते.



## 'कुणाची मने तुटली तरी मला फरक पडत नाही...'

मुंबई-यांच्यात आयसीसी टी-ट्वेंटी वर्ल्ड कपचा फायनल सामना खेळवला जाणार आहे. अशातच न्यूझीलंडचा कॅप्टन मिचेल सँटनरने फायनल मॅचपूर्वी झालेल्या प्रेस कॉन्फरन्समध्ये भारतीय टीमचे कौतुक केलं आहे. अहमदाबादचे पीच बॅटिंगसाठी पोषक आणि 'फ्लॅट' असेल, असा अंदाज त्यानं वर्तवला आहे. या हाय-स्कोरिंग मॅचमध्ये जसप्रीत बुमराह हा भारतासाठी 'गेमचेंजर' ठरू शकतो, असं मत सँटनरने व्यक्त केलं आहे. भारतीय बॅट्समनने सेमीफायनलमध्ये २५० हून अधिक रन्स केल्यामुळे सध्या त्यांच्याकडे मोठी लय असल्याचंही सँटनरने म्हटलं आहे.

सँटनरने पुढे म्हटले की, न्यूझीलंड गेल्या काही टूर्नामेंट्समध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करत आहे. फायनलमध्ये मैदानावर उपस्थित असलेल्या हजारो भारतीय चाहत्यांना शांत करणे हं आमचे मुख्य ध्येय असेल. जर ट्रॉफी जिंकण्यासाठी मला एकदा काहीजणांची मन तोडावी लागली तर मला फरक पडणार नाही, असं वक्तव्य सँटनरने केले आहे. घरच्या मैदानावर खेळत असल्याने टीम इंडियावर विजयाचा मोठा दबाव असेल, ज्याचा फायदा घेण्याचा कीवी संघ प्रयत्न करेल, असंही तो म्हणाला.

वरुण चक्रवर्तीच्या सध्याच्या खराब फॉर्मवर बोलताना सँटनरने त्याची पाठराखण केली. तो म्हणाला की, ''वरुण हा एक उत्तम बॉलर आहे आणि तो फॉर्ममध्ये परतण्यापासून केवळ एक मॅच लांब आहे.'' जरी सध्या हे पीच सपाट दिसत असले तरी, वरुणसारखा खेळाडू कधीही पुनरागमन करू शकतो याची न्यूझीलंडला कल्पना आहे. त्यामुळे कीवी बॅट्समन वरुणला हलक्यात घेण्याची चूक करणार नाहीत.

दरम्यान, रविवारी होणाऱ्या या फायनलमध्ये न्यूझीलंडचा संघ भारताचे विजेतेपदाचे स्वप्न रोखण्यासाठी सज्ज झाला आहे. सँटनरच्या मते, मैदानातील शांतता हीच त्यांच्या यशाची पावती असेल. आता ८ मार्च रोजी होणाऱ्या या महामुकाबल्यात भारतीय फॅन्सना शांत करण्यात कीवी संघ यशस्वी होतो की सूर्यकुमारची सेना बाजी मारते, हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल.

### मिशेल सँटनरचे चिथावणीखोर वक्तव्य, कर्णधार सूर्यकुमार यादवचं चोख प्रत्युत्तर

टी२० विश्वचषकाचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात रविवारी म्हणजे ८ मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. या फायनल सामन्यापूर्वी न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनर आणि भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले आहे. पत्रकार परिषदेत मिशेल सँटनरचे चिथावणीखोर वक्तव्य केले होते. त्याच्या वक्तव्याला सूर्यकुमार यादव चोख प्रत्युत्तर दिले आहे.नेमके काय म्हणाला सूर्यकुमार यादव?न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनर याच्या वक्तव्यावर बोलताना कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला की, प्रत्येकजण तेच सांगत आहे. त्यांनी काहीतरी नवीन घेऊन यावे, असे प्रत्युत्तर यादवने दिले. सूर्यकुमार यादव म्हणाला की, घरच्या चाहत्यांसमोर विश्वचषकाचा अंतिम सामना खेळणे हा एक खास अनुभव आहे. संघातील प्रत्येक सदस्य या क्षणाबद्दल उत्साहित आहे.

### एक नव्हे दोन विकेटकीपर ठेवा, अभिषेक शर्माची संजूकडे मागणी, अर्शदीप सिंगचे नाव घेत काय म्हणाला?

मुंबई-मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर भारत आणि इंग्लंड यांच्यात टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा दुसरा उपांत्य सामना खेळला गेला. या सामन्यात हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह वगळता टीम इंडियाच्या इतर गोलंदाजांची इंग्लिश फलंदाजांनी चांगलीच धुलाई केली. विशेषत: अर्शदीप सिंगचा दिवस फारसा खराब राहिला. त्याने चार षटकांत तब्बल ५१ धावा दिल्या आणि त्यात पाच वाइड चेंडू टाकले.

भारत-इंग्लंड सामन्यानंतर सोशल मीडियावर एक व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये अभिषेक शर्मा, ईशान किशन, अर्शदीप सिंग आणि संजू सॅमसन टीम बसमध्ये एकत्र दिसत आहेत. दरम्यान, अर्शदीपने अभिषेकच्या फील्डिंगचं कौतुक करत नाइस फील्डिंग असं म्हटलं. यावर अभिषेकने लगेचच त्याची टांग खेचली. अर्शदीपची दिशाहीन गोलंदाजी चिमट्याने घेत अभिषेक म्हणाला की, अर्शदीपला गोलंदाजी करताना दोन विकेटकीपर लागतात, कारण तो खूप वाइड टाकतो.

अभिषेकच्या या टोमण्यानंतर अर्शदीपनेही हसतच संजू सॅमसनकडे वळून विचारलं, ''संजू भाई, मग दोन कीपर लावू का?'' आणि लगेच ईशान किशनकडे बोट दाखवत म्हणाला की, ''आपल्या प्लेइंग इलेव्हनमध्ये तर दोन विकेटकीपर आहेतच.'' कारण त्या सामन्यात संजू सॅमसन आणि ईशान किशन दोघेही खेळत होते. या मजेशीर संवादाचा व्हिडिओ चाहत्यांना खूप आवडला असून सोशल मीडियावर त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

सध्या सुरू असलेल्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा फारसा फॉर्ममध्ये दिसत नाही. झिम्बाब्वेविरुद्ध केलेल्या ५५ धावांच्या खेळीचा अपवाद वगळता इतर सामन्यांत त्याचा बॅट शांतच राहिला आहे. इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यातही अभिषेकला मोठी खेळी करता आली नाही. तो ७ चेंडूत फक्त ९ धावा करून बाद झाला. त्यामुळे आता अंतिम सामन्यात मोठी खेळी करत टीम इंडियाला विजय मिळवून देण्याची त्याच्याकडून अपेक्षा आहे. दुसरीकडे अर्शदीप सिंगने या वर्ल्ड कपमध्ये आतापर्यंत ९ विकेट घेतल्या असून संघासाठी तो महत्त्वाचा गोलंदाज ठरला आहे.

# टी२० विश्वचषकात भारताने न्यूझीलंडविरुद्ध जिंकला नाही एकही सामना

अहमदाबाद,७ मार्च (पीएसआय) २०२६ चा टी-२० विश्वचषक आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. चालू स्पर्धेचा अंतिम सामना-८ मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघात खेळला जाईल. टीम इंडिया हा सामना जिंकून इतिहास रचण्याचा प्रयत्न करेल. मात्र, या सामन्यात न्यूझीलंडला हरवणं टीम इंडियासाठी सोपं नसेल. खरं तर, टी-२० विश्वचषकात न्यूझीलंडविरुद्ध टीम इंडियाचा रेकॉर्ड आतापर्यंत खूपच खराब राहिला आहे.

**दोन्ही संघांचा हेड-टू-हेड रेकॉर्ड काय :**

टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये हेड-टू-हेड रेकॉर्डबद्दल बोलायचं झालं तर, भारत आणि न्यूझीलंडनं आतापर्यंत एकूण ३० सामने खेळले आहेत. टीम इंडियानं यापैकी १८ सामने जिंकले आहेत, त्यापैकी दोन विजय सुपर ओव्हरमध्ये मिळाले आहेत. न्यूझीलंडनं ११ सामने जिंकले आहेत, त्यापैकी एक पावसामुळं रद्द झाला होता. भारतानं न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर १६ पैकी ११ सामने जिंकले आहेत. इथं टीम इंडियाचा वरचष्मा असल्याचं दिसतं.

**टी-२० विश्वचषकात भारताला न्यूझीलंडला हरवता आलेलं नाही :**

टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये टीम इंडियाचा न्यूझीलंडवर वरचष्मा आहे, परंतु टी-२० विश्वचषकात दोन्ही संघांमधील हेड-टू-हेड रेकॉर्ड पाहता, चित्र वेगळं आहे. भारत आणि न्यूझीलंडनं आतापर्यंत तीन टी-२० विश्वचषक सामने खेळले आहेत. न्यूझीलंडनं तिन्ही सामने जिंकले आहेत. २००७, २०१६ आणि २०२१ च्या स्पर्धांमध्ये न्यूझीलंडनं भारताचा पराभव केला आहे. त्यामुळं, टीम इंडिया आता हा सामना जिंकून हा विक्रम बदलण्याचा प्रयत्न करेल.

**न्यूझीलंडला भारतात खेळण्याचा अनुभव :**

टी-२० विश्वचषक २०२६ च्या अगदी आधी, न्यूझीलंड संघानं व्हाईट-बॉल मालिकेसाठी भारताचा दौरा केला होता. या मालिकेदरम्यान, दोन्ही देशांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली गेली आणि टीम इंडियानं ४-१ असा विजय मिळवला. कीवींना भारतात खेळण्याचा बराच अनुभव आहे आणि या अंतिम फेरीत टीम इंडियासमोर ते एक कठीण आव्हान उभं करतील. या विश्वचषकात भारत आणि न्यूझीलंडच्या कामगिरीबद्दल बोलायचं झालं तर, टीम इंडियानं स्पर्धेत आतापर्यंत फक्त एकच सामना गमावला आहे. दुसरीकडे, न्यूझीलंडला दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्ध पराभव पत्करावा लागला आहे.



## महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल; जागतिक महिला दिनानिमित्त विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे प्रभाग क्र १४ मधील ६८ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान



**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनानिमित्त विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्रमांक १४ मधील संभाजी नगर येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ६८ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ॲग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारतून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे.

या केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान महिलांना देण्यात आले. प्रशिक्षक प्रेमा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या ६८ महिलांनी शिलाई कामातील सर्व कला आणि कौशल्ये आत्मसात केली.

या माध्यमातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे,

श्री गणेश देशमुख, प्रकाश शिंदे,संतोष नरटे ,कुलभूषण घोडके,रेणुका शिंदे, प्रशिक्षक प्रेमा ठाकूर आणि गजानन बोयणे,सोमनाथ कावळे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## आरटीई २५% प्रवेशासाठी 'एक किलोमीटर' अट रद्द करून ऑनलाइन साठी मुदतवाढ देण्यात यावी - दत्ता (तात्या) पेठे



**धाराशिव/प्रतिनिधी:** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत 'घरापासून शाळा एक किलोमीटर अंतरावर असावी' ही अट रद्द करण्याची मागणी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

सन २०२६२७ शैक्षणिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. १७ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाली आहे. या प्रवेशासाठी शासनाने घरापासून शाळा एक किलोमीटर अंतरावर असावी अशी अट लागू केली आहे. यापूर्वी ही मर्यादा पाच किलोमीटरपर्यंत होती, त्यानंतर ते अंतर कमी करून तीन किलोमीटर पर्यंत करण्यात आली होती. मात्र सध्या ती यावर्षी आणखीन कमी करून एक किलोमिटर करण्यात आल्याने अनेक पालकांना अर्ज करताना अडचणी येत आहेत.

ऑनलाईन अर्ज भरताना पोर्टलवर एक किलोमीटरच्या पुढील शाळा दिसत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज भरता येत नाहीत. त्यामुळे दुर्बल व वंचित घटकातील अनेक विद्यार्थी या शैक्षणिक संधीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपल्या पाल्याला चांगले व दर्जेदार शिक्षण मिळावे, अशी इच्छा असूनही अनेक पालकांना या अटीमुळे प्रवेश मिळवणे कठीण जात आहे.

दरम्यान, आरटीई ऑनलाईन प्रवेशासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १० मार्च २०२६ असल्याने ही अट तातडीने रद्द करून अर्ज दाखल करण्याची मुदत वाढवण्यात यावी व विद्यार्थ्यांना दर्जे दार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सदरील निवेदन दत्ता (तात्या) पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी सुमेध क्षीरसागर, संतोष मोरे, संतोष पेठे, शाहूराज चव्हाण, बालाजी कांबळे, राहुल पेठे, सचिन बगाडे, राज मगर, अमर कांबळे, आशिष पेठे, सचिन पेठे, तानाजी क्षीरसागर, शिवाजी क्षीरसागर आदी उपस्थित होते.

# शिक्षण क्षेत्रात देशात प्रथमच उभारण्यात आलेल्या 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर'चे उद्‌घाटन १२ मार्च रोजी

### विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकासासाठी महत्वपूर्ण

**पुणे/प्रतिनिधी :** 'व्यक्तीचा (आत्म्याचा) मातीशी संबध जोडणे' हा मुख्य धागा पकडून देशात प्रथमच उच्च शिक्षणामध्ये केलेला प्रयोग म्हणजे 'जीवन परिवर्तन केन्द्र' (लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर). याची उभारणी दौंड तालुक्यातील बोरीबेल येथे करण्यात आली आहे. स्व.उर्मिला वि. कराड यांच्या स्मृतिप्रित्यार्थ उभारण्यात आलेल्या लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर (एलटीसी) चे उद्घाटन गुरूवार, दि. १२ मार्च २०२६ रोजी दुपारी ४.०० वा. होणार आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. अशी माहिती एलटीसीचे संकल्पक व निर्माते युवा शिक्षण तज्ज्ञ डॉ. राहुल वि. कराड यांनी पत्रकार परिषदेत दिली. एलटीसीच्या उद्घाटन प्रसंगी पतांजली योगपीठाचे संस्थापक व अध्यात्मिक गुरू स्वामी रामदेव बाबा आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार हे विशेष सन्माननीय पाहुणे



म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच ले. जनरल धिरज सेठ (पीव्हीएसएम, एव्हीएसएम) जनरल ऑफिस कमांन्डिंग इन चीफ साउथन कमांड आणि राजीव गांधी खेल रत्न अवॉर्डी रंजन सोधी पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याच प्रमाणे आमदार श्रीकांत भारतीय, आमदार ॲड. राहुल कुल, लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड, सरपंच नंदकिशोर पाचपुते, महाराष्ट्र स्टेट ग्राम पंचायत ऑफिसर्स युनियनचे अध्यक्ष संजीव निकम आणि पद्मश्री पोपटराव पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कृषी (शेती) आणि प्रकृति , शारीरिक स्वास्थ्य आणि खेळ, संघ निर्माण आणि नेतृत्व, देशभक्ती आणि राष्ट्रनिर्माण व अध्यात्म आणि शांती या ५ स्तंभावर आधारित या केंद्रामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक व मानसिक आरोग्य जोपासण्या बरोबरच जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करण्याचा हा शैक्षणिक क्षेत्रातील मैलाचा दगड असलेला प्रयोग आहे.

सशक्त भारत आणि विश्वाच्या निर्मितीसाठी प्रत्येक युवकामध्ये परिवर्तन घडविण्याचे मुख्य लक्ष्य निर्धारित करून एलटीसीचे निर्माते व युवा शिक्षण तज्ञ डॉ. राहुल कराड यांनी पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील बोरीबेल या ठिकाणी १५० एकरपेक्षा अधिक कार्यक्षेत्रामध्ये या केंद्राची स्थापन केली आहे. येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाबरोबरच आत्म शोधासाठी मदत करण्याचा प्रत्यक्ष अनुभव देणारी परिसंस्था आहे. आत्म्याचा मातीशी संबंध जोडणे या तत्वावर आधारित ही संकल्पना आहे.

या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दिले जाणारे प्रशिक्षण हे अनुभवाधारित असेल. जीवनातील प्रत्यक्ष आव्हाने समजून घेऊन त्यावर आधारित म्हणजे समस्या आधारित शिक्षण दिले जाईल. देशाचा सजग नागरिक बणण्यासाठी व पर्यावरणाभिमुख शिक्षण दिले जाईल. आधुनिक जगात प्रत्येक व्यक्ती हा मोबाईल व सोशल मिडियाच्या प्रभावाखाली असून तो अत्यंत गतिमान जीवनशैली व्यतीत करीत आहे. त्यामुळे रोजच्या जीवनात ताण-तनाव निर्माण झाला आहे. या सेंटरमध्ये 'किमानता' हे एक महत्वाचे उद्दिष्ट्ये असून येथे साधी राहणी, अनावश्यक गोष्टी कमी करुन किमान अत्यावश्यक गोष्टींकडे लक्ष केंद्रीत करण्यास शिकविले जाईल. आजच्या डिजिटल युगात वेगावान जीवनशैली, सततची माहितीची गर्दी आणि स्पर्धेचा ताण यामुळे तरुणांचा निसर्ग, समाज अणि स्वतःच्या अंतर्मनाशी असलेला संबंध कमी होत असल्याची जाणीव वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एलटीसी तरुणांना थोडे थांबवून, स्वतःकडे आणि जीवनाकडे संतुलित दृष्टिकोनातून पाहण्यासाठी प्रवृत्त करते. साधेपणा मितव्ययिता आणि जागरुक जीवनपद्धती या संकल्पना येथे अनुभवातून रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ.आर.एम. चिटणीस, डॉ. दत्ता दंडगे आणि डॉ. श्रुती निगुडकर उपस्थित होते.


## लातूर जिल्हा पंचायत समित्यांच्या गटनेतेपदी उदगीरमधून ॲड. भास्कर जाधव, जळकोटमधून राजेश केंद्रे, निलंग्यातून किरण पाटील तर औशातून अभिजित देशमुख यांची निवड

***लातूर/प्रतिनिधी* :** लातूर जिल्ह्यातील जळकोट, निलंगा, औसा आणि उदगीर या चार महत्त्वाच्या तालुक्यांतील काँग्रेस पक्षाच्या पंचायत समिती सदस्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक आज लातूर येथील काँग्रेस भवन मध्ये उत्साहात पार पडली. जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत चारही तालुक्यांतील गटनेता, उपगटनेता आणि प्रतोद यांच्या अधिकृत निवडीची घोषणा करण्यात आली. पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली निर्णय या निवडींचे सर्वाधिकार चारही तालुक्यातील पंचायत समिती सदस्यांनी एकमताने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांत अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राज्याचे माजी मंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमित विलासरावजी देशमुख यांना दिले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासरावजी देशमुख यांच्या मान्यतेने जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी या निवडी आज जाहीर केल्या.

चारही तालुक्यातील नवनियुक्त पदाधिकारी

उदगीर पंचायत समितीच्या गटनेतेपदी ॲड. भास्कर जाधव यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा तालुक्याच्या विकासकामांना होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

जळकोट पंचायत समितीमध्ये गटनेतेपदी राजेश केंद्रे (माळहिप्परगा) यांची निवड करण्यात आली असून, प्रतोद म्हणून प्रा. माधव वाघमारे



(अतनूर) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निलंगा पंचायत समितीच्या गटनेतेपदी किरण पाटील (दापका) यांची निवड झाली आहे. त्यांच्यासोबत उपगटनेता म्हणून अभिजित उसनाळे (अनसरवाडा), मुख्य प्रतोद म्हणून श्रीमंत जाधव (शेडोळ) आणि प्रतोद म्हणून सिंधु हजारे (सय्याखानचिंचोली) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

औसा पंचायत समितीमध्ये गटनेतेपदाची जबाबदारी अभिजित प्रमोद देशमुख यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तसेच उपगटनेता म्हणून अंजुमबी कारभारी, मुख्य प्रतोद म्हणून किशोर जवंजाळ आणि प्रतोद म्हणून शितल फावडे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

जनसंपर्क आणि पक्षबांधणीवर भर निवडी जाहीर करताना जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

''निवड झालेले सर्व पदाधिकारी जनसंपर्क असलेले आणि अभ्यासू कार्यकर्ते आहेत. आगामी काळात पंचायत समितीच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि काँग्रेसची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी हे सर्वजण प्रभावीपणे कार्य करतील,'' असे त्यांनी यावेळी नमूद केले. या बैठकीला चारही तालुक्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, पंचायत समिती सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धावती ट्रेन पकडताना झालेला मृत्यू हा अपघातीच, हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**मुंबई/प्रतिनिधी:** फलाटाच्या विरुद्ध दिशेने मेल एक्सप्रेस पकडताना झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या पीडित कुटुंबाला नुकसानभरपाई देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं रेल्वे प्रशासनाला दिलेत.

हायकोर्टाचा निकाल काय? : अनुचित घटनेची व्याख्या या अपघाताला लागू होत नाही. त्यामुळे या प्रकरणात पीडिताच्या कुटुंबाला नुकसानभरपाई देता येणार नाही, असा दावा मध्य रेल्वेनं हायकोर्टात केला होता. मात्र पूर्ण सुनावणीअंती न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठानं रेल्वेचा हा दावा फेटाळून लावला. रेल्वेनं आपला दावा सिद्ध करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा कोर्टापुढे सादर केलेला नाही, असं नमूद करत हायकोर्टानं पीडिताच्या कुटुंबाला ४ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाला दिलेत. तसेच साल २०११ मध्ये घटना घडल्याच्या दिवसापासून या रकमेवर ६ टक्के व्याजही पीडित कुटुंबाला देण्यात यावं, असंही हायकोर्टानं आपल्या निकालात नमूद केलंय.

# जागृती शुगर कारखान्याची वजन काटे भरारी पथकाकडून तपासणी

### शासनाकडून अचूक काटे असल्याचे प्रमाणपत्र

***लातूर/प्रतिनिधी* :** राज्यातील खाजगी साखर कारखानदारीत एफ. आर.पी पेक्षा अधिक भाव ऊस पुरवठा शेतकऱ्यांना देणाऱ्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईंड इंडस्ट्रीजला साईटवर वजन काटे यांची शासकीय अधिकारी यांच्यासह शेतकरी प्रतिनिधींनी संयुक्त पथकाद्वारे पाहणी केली तपासणी केल्यानंतर कारखान्यावर काटा योग्य व अचूक असल्याचा निष्कर्ष समितीने दिला आहे त्यामुळे जागृति शुगर ला अचूक काटे असल्याचे प्रशस्तीपत्र बहाल करण्यात आले आहे.

भरारी पथकाची अचानक भेट व तपासणी

सध्या जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्याकडे वजन काटे तपासणीसाठी भरारी पथकाची नियुक्ती केल्याने आज शुक्रवारी अचानक वजन करून व गव्हाणीकडेगे लेल्या वाहनांना परत बोलवून काट्याची तपासणी केली भरलेली व रिकामे केलेली वजन घेण्यात आले ते अचून असल्याचे त्यांनी सांगितले त्यानुसार जागृती शुगर म्हणजे प्रगती या ब्रीदवाक्य प्रमाणे उस उत्पादक शेतकऱ्यांचा विकास, विश्वास या साखर कारखान्याने आपले वेगळेपण जपले आहे ते पुन्हा अधोरेखित झाले आहे राज्याचे माजी मंत्री जागृति शुगरचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेब, जागृति शुगर च्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालक आदरणीय सौ गौरवी ताई अतुलबाबा भोसले देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांच्या सूचनेनुसार कारखाना व्यवस्थापन नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भरारी पथकात देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर वैद्यमापनशास्त्र निरीक्षक कांबळे एम आर, लेखा परीक्षक श्रेणी २ आर बी पवार, पोलीस उपनिरीक्षक एस जी कोंडामंगले, कारखान्याचे सरव्यवस्थापक गणेश येवले, उपअभियंता अक्षय सूर्यवंशी ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण



बिराजदार प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी धनाजी जाधव, ऊस उत्पादक शेतकरी विष्णू निडवंचे, विजेंद्र कोटे राहणार तळेगाव, सहाय्यक केनयार्ड सुपर वायझर महेश काळे आदी उपस्तीत होते.

## रेनबो प्रि इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण संपन्न

***लातूर/प्रतिनिधी* :** मोती नगर भागातील रेनबो इंग्लिश स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कोरे गार्डन येथे संपन्न झाले कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगरसेविका सौ सुनीता चाळक यांच्या हस्ते सरस्वती दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था उपाध्यक्ष ज्ञानदेवराव तेलंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन नगरसेवक गणेश गवारे,नगरसेवक उद्धव तेलंगे, शिरुर अनंतपाळ पंचायत समिती सदस्य संजय सूर्यवंशी आदीची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी प्रास्ताविक संस्था अध्यक्ष प्रा. गिरीधर तेलंगे यांनी सादर केले. व्यासपीठावर यशवंत विद्यालयाचे सहशिक्षक विवेकानंद चिंचोले, नूतन प्राथमिक विद्यालयाचे सहशिक्षक संतोष केंद्रे,स्कूलच्या प्राचार्या सौ आश्विनी तेलंगे आदींची उपस्थिती होती.

यापसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे सौ सुनीता चाळक,उद्धव तेलंगे, गणेश गवारे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या,यामध्ये जवळपास ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा चे सूत्रसंचालन सौ खुशी तिवारी आभार सौ मोहिनी धुमाळ यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैशाली सोमवंशी, सौ. अनिता चिंताले, आदींनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

## ➤ वडवळ नागनाथ येथे आयोजित समाधान शिबिराचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन
## ➤ नागरिकांना शासकीय प्रमाणपत्रे, योजनांच्या लाभ पत्राचे वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळवून देण्यासाठी चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले. तसेच यावेळी विविध शासकीय योजना मंजुरी प्रमाणपत्रे, दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, पंचायत समिती सदस्य मिरावती कसबे, गजानन होनराव, भुजंगराव शिंदे, वडवळ नागनाथचे सरपंच मुरलीधर सोनकांबळे यांच्यासह वडवळ नागनाथ महसूल मंडळातील सरपंच व नागरिक यावेळी उपस्थित होते.






छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरामुळे एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा, योजनांचा लाभ मिळत आहे. महसूल विभागामार्फत पांदण रस्ते, शेत रस्त्याची कामे केली जात आहेत. यासाठी सुटसुटी धोरण तयार करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिकांसाठी आवश्यक दाखले वाटपाची कार्यवाही गतिमान करण्यात आली असल्याने नागरिकांची गैरसोय दूर झाली असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच राज्याचा अर्थसंकल्प सादर केला असून शेती आणि ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी यामध्ये भरीव तरतूद करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी समाधान शिबिराच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, सेवा महसूल मंडळात एकाच छताखाली मिळाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव यांनी प्रास्ताविक केले. महसूल विभागाच्या योजना, सेवांची माहिती व लाभ देण्यासोबतच इतरही शासकीय विभागांच्या योजनांची माहिती समाधान शिबिराच्या माध्यमातून देण्यात येत आहे. या शिबिरात महसूल विभागाच्या जवळपास पंधरा सेवा देण्यात येत आहेत. तालुक्यातील सर्व महसूल मंडळांमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, पुरवठा विभागामार्फत नवीन शिधापत्रिका, आरोग्य विभागामार्फत आयुष्यमान भारत कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र, महिला व बालविकास विभागामार्फत बेबी कीटचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत दुधाळ जनावरांच्या गटासाठी अनुदान धनादेश वितरण करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिबिरानिमित्त उभारण्यात आलेल्या स्टॉल्सला सहकार मंत्री श्री. पाटील यांनी भेट देवून उपलब्ध सेवांची माहिती घेतली.

### मनपा शाळेत Eat Right मोहिमेस सुरुवात

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संतुलित आहार या मोहिमेचा मनपाच्या शाळा क्रमांक ९ येथून शुभारंभ करण्यात आला. मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या संकल्पनेतून तसेच उपायुक्त श्रीमती वसुधा फड यांच्या मार्गदर्शनात मनपा शाळा मधील विद्यार्थी व त्यांच्या पालकांसोबत आरोग्य विभागाच्या वतीने संतुलित आहार विषयी चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मागील महिन्यापासून मनपा शाळातील सर्व मुलांची तपासणी सुरू आहे. शाळकरी मुलांच्या वाढीकडे लक्ष देत त्यांच्यातील कुपोषितपणा शोधण्याचे काम यातून केले जात आहे. या तपासणीमध्ये जी मुले वयोमानानुसार वजनाने कमी आढळली त्यांची पुढील वर्षभरात दर महिन्यास तपासणी केली जाणार आहे. गरज पडल्यास मोफत औषधोपचार करून वजन वाढविण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने आहाराविषयी समुपदेशन केले जाणार आहे.

## आनंदवाडी ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**नळेगाव/अजगर मजकुरी :** ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. आज जागतिक महिला दिनानिमित्त सर्व प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आज जागतिक महिला दिनी स्त्री शक्तीचे झालेले प्रगतिकरण जगाची आई ही आता जगाची पोशिंदी आहे या शक्ती रूपास सलाम. स्त्री म्हणजे वास्तव स्त्री म्हणजे मातृत्व स्त्री म्हणजे पावित्र्य स्त्री म्हणजे कतृ नारीचे जगात आहे कर्तृत्व विशाल..तिच खरी प्रत्येकाच्या उर्जेचे मशाल...अशा महान महिलांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बाल विवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे, हुंडा बंदी करणे, महिला सक्षमीकरण करणे अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. व महिला सूचनांनुसार दोन दिवसांत डोळ्यांचे व आरोग्य शिबिर घेण्याचे ठरले. या प्रसंगी सरपंच भागवत वंगे उपसरपंच व्यंकट कल्ले ग्रामविकास अधिकारी संजय रोडेवाड, रंजित मरे, सदस्य सारिका शिरूरे बालिका कल्ले, रूक्मिणबाई वंगे, बचत गटाचे अनुसया शिरूरे, मंडोदरी चलमले, अनूसया डोंगरे, सुवर्णा आर्धे, सुजाता दिवेकर, सुधामती दिवेकर, मिना चलमले , उर्मिला कोल्हे, अंजली सोनवणे, गयाबाई भूसागरे, कांताबाई बनसोडे, आदी महिला उपस्थित होते.

## शिवसेना लातूर शाखेच्यावतीने शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट

**लातूर/प्रतिनिधी :** प्रतिवर्षाप्रमाणे तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करताना शिवसेनेच्या लातूर शाखेच्या वतीने येथील शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात आले.

याप्रसंगी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे लातूर शहर प्रमुख दिनेश बोरा, शहर संघटक संदीपमामा जाधव, चंद्रकांत शिंदे, श्रीनिवास लांडगे, दत्ता भोसले, आकाश चामले, शंकर कलवले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राज्यात शिवसेनेची कारकीर्द दिवसेंदिवस बहरत आहे. सामान्यांना न्याय देण्यासोबतच तरुण पिढीला ऐतिहासिक वारशांची संपूर्ण माहिती मिळावी, त्यांच्या ज्ञानात कमालीची भर पडावी याकरिता दरवर्षी लातूर शहरातील शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात येतात. या ग्रंथाचा उपयोग स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह इतिहास अभ्यासकांना होताना दिसतो. शिव जयंतीच्या निमित्ताने अनावश्यक आणि अवास्तव खर्चाला फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील मौलिक ग्रंथ भेट देण्यात आले. या ऐतिहासिक ग्रंथांचा आपल्याला अतिशय उपयोग होत असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

## उन्हाळ्यानिमित्त काळजी घेण्याबाबत नागरिकांना दिली प्रतिज्ञा




रोहिना नगर, जुळे सोलापूर येथे उन्हाळ्यानिमित्त काळजी घेण्याबाबत नागरिकांना प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी डॉ. मोटे,डॉ. संजय जमदाडे, सौ.हिब्बाळ आदि मान्यवर उपस्थित होते. उन्हाळा सुरक्षा प्रतिज्ञा मी प्रतिज्ञा करतो की वाढत्या उन्हाळ्याचा सामना करण्यासाठी मी स्वतःची आणि इतरांची काळजी घेईन,मी पुरेसे पाणी पीईन, उन्हात जाणे टाळीन, सुती कपडे वापरेन आणि गर्मीपासून वाचण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेईन.आपल्या परिसरातील झाडांचे जतन करीन आणि पशु पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था करीन. सुरक्षित आणि आरोग्यदायी उन्हाळा घालण्यास मी कटीबद्ध आहे.!

## आनंदायी शनिवार उपक्रम: कागदापासून विविध वस्तू बनवणे उपक्रमांतून शिक्षण

**उदगीर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तिवटग्याळ ता उदगीर जिल्हा लातूर येथे आज शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर बडगे यांनी आज शनिवार निमित्ताने शनिवार माझा आवडीचा, अभ्यासक्रमातून खेळू करु शिकू विषयातीलकागदापासून विविध वस्तू बनवणे या उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली.जहाज, विमान, टोपी, चक्र बनवून घेतले. विद्यार्थांना गोल वर्तुळाकार बसून क्रमाने बसवून आनंदायी शनिवार उपक्रमांतून इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत च्या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर बडगे यांनी हा उपक्रम समजावून सांगितले व प्रात्यक्षिक करुन दाखवले . प्रथम शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर बडगे यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमांची सविस्तर माहिती समजावून सांगितली. रीतीने सर्व विद्यार्थ्यांचा सहभागी घेऊन. कागदापासून विविध वस्तू बनवणे शैक्षणिक खेळ घेतला. अशा पध्दतीने या उपक्रमांत शाळेतील सर्व विद्यार्थांना सहभागी करुन घेतले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर बडगे व शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले.

## जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**लातूर/प्रतिनिधी :** येथील आधार सामाजिक संस्था व राजश्री फाउंडेशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला यावेळी संस्थेचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते. आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अगदी त्याच्याही पुढे जाऊन कार्य करत आहेत.

या महिलांचे मनोबल वाढावे, त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने येथील आधार सामाजिक संस्था आणि राजश्री फाउंडेशनचे कार्यालय प्रकाश नगर याठिकाणी महिला बाल कल्याण विभागातील सेवानिवृत्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी अड मल्लिकार्जुन करडखेलकर यांच्या शुभ हस्ते प्रा. अनिता गायकवाड, मुख्याध्यापक जयश्री ढवळे,डॉ. रुपाली येळीकर, पो. कॉ. अनिता सातपुते,रुकसाना मुल्ला, सौ. काळे यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष धनंजय कांबळे, सचिव प्रा. रविंद्र सुरवसे, प्रा. कल्याण कांबळे, प्रा. शिवशरण हावळे, प्रा. संगमेश्वर पानगावे, प्रा. बालाजी माने, रेश्मा कांबळे, ज्योती सुरवसे, अतुल कांबळे आणि संस्थेचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरवसे, प्रास्ताविक बालाजी माने तर आभार संगीता कांबळे यांनी मानले.

### जय हो

उत्साह यंदा शिगेला
स्पर्शे आनंदे नभास
स्वप्नपूर्ती देई स्फुर्ती
सत्यात येई आभास

गवसणी घाली सुखे
अंति विश्व चषकांस
अद्वितीय आत्मानंद
देई रसिक प्रेक्षकांस

विजयस्वताचं हजर
बदले सगळे कयास
सोपे नव्हते जिंकणे
अथक सराव प्रयास

मैदानात रे खचाखच
भरला संपूर्णविश्वास
उत्कंठा वृध्दी खेळात
रोखून धरलेला श्वास

उंचावलेल्या अपेक्षा
परिपूर्ण केल्या खास
बाजी लावे बाजीगर
संतृप्त करे रसिकांस

डंका वाजे विजयश्री
चकित अवघे विश्वास
भारतीय ऐक्य भावना
सार्थ केलाय विश्वास

कशी आली दिवाळी
असूनि फाल्गुन मास
जगत्जेता असा असे
पुन्हा रचला इतिहास

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

## अटल टिंकरिंग लॅब सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय प्रदर्शनीत केशवराज विद्यालयाचे घवघवीत यश




**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लातूर यांनी अटल टिंकरिंग लॅब सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय प्रदर्शनीचे आयोजन केले होते. यात यातील या विषयासाठी श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचे चि. समर्थ अक्षय पोटे (९ वी ड ) व चि. नरसिंग तुकाराम नारायणपुरे (९ वी ड) या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले असून त्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना अटल टिंकरिंग लॅबचे प्रमुख लक्ष्मीकांत बुगदे व शरद पांचाळ यांनी मार्गदर्शन केले होते.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई–प्रोक्योरमेंट**
विभागीय भांडार कार्यालय,मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई–प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई–निविदा मागवीत आहेत. **०१ निविदा क्रमांक:**–९६२६५०७६, **०२ वर्णन:**– आरडीएसओ स्पेसिफिकेशन क्रमांक टीआय/एसपीसी/ओएचई/सीडब्ल्यू/०९७१ किंवा नवीनतम नुसार सतत कास्ट कॉपर वायर रॉडपासून बनवलेले जॉइंटलेस ग्रूव्हड कॉपर कॉन्टॅक्ट वायर, १०७ चौरस मिमी. **०३ प्रमाण:**– १७.५ किमी, **०४ बयाणा रक्कम** (INR):–रु.३११६९०.००, www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ** ३०–०३–२०२६ रात्री ११:३० नंतर., संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.
15 सीनियर डीएमएम/सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई–प्रोक्योरमेंट**
विभागीय स्टोअर ऑफिस मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई–प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई–निविदा मागवल्या आहेत. **०१ निविदा क्रमांक:**– ९६२६५०७८, **०२ वर्णन:**–अन–इन्सुलेटेड कॅडमियम कॉपर कॅटेनरी वायर ६५ चौरस मिमी (१९/२.१० मिमी) तपशील: टीआय एसपीसी ओएचई कॅट क्यू–सीडी ०९७१, एसटीआर: टीआय एसटीआर ०२० रेव्ह ०२ किंवा नवीनतम. **०३ प्रमाण:**– २१.५ किमी, **०४ बयाणा रक्कम** (INR):– www.ireps.gov.in वर **निविदा बंद करणे:** २५–०३–२०२६ रात्री ११:३० नंतर., संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.
16 वरिष्ठ निविदा व्यवस्थापक/सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, पायी प्रवास टाळा

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
पाउडरप्रूफ ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६